# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 25/12/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत रेल्वे चौकी खापरखेडा नागमंदीर जवळ येथे दिनांक 22/12/2021 चे 14:00 वा. ते 14:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पंकज अभीमन्यु बागडे, वय 42 वर्ष, रा. वार्ड क्र 04 चर्च जवळ खापरखेडा हा आपली एमएच– 40/एव्ही– 8070 क्रमांकाच्या मोटारसायकल घेवुन किराणा सामान आण्याकरीता खापरखेडा येथे नागमंदीर जवळ मोअरसायकल उभी करून किराण सामान घेण्याकरीता दुकानात गेला. तो अर्ध्या तासाने परत आला असता त्याची मोटारसायकल दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किमती 30,000/–रू. मोटारसायकल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जानुसिंग जाधव हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील मौजा भोरदेव येथे दिनांक 23/12/21 चे 22:00 वा. ते 05:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– भारत श्रीमानजी आस्वले, वय 50 वर्ष, रा. भोरदेव कुही जि. नागपूर व गावातील 3 लोकांच्या घरातील अंगनात बक–या बांधुन ठेवल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने अंदाजे कि. 1,000/–रू. प्रमाने 9 बक–या किं. 9000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ठमके मो.क्र. 9823971453 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत मौजा महालगाव शिवार येथे दिनांक 24/12/2021 चे 15.55 वा. ते 16.50 वा. पर्यंत अज्ञात आरोपीने त्याच्या विना क्रमांकाचे ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये विना परवाना एक ब्रॉस रेती (गौण खनिज) चोरटे वाहतुक करतांनी मिळुन आला. घटनास्थळी एक ब्रॉस रेती किंमती 4,000/–रू. व एक ट्रॅक्टर व ट्रॉली किंमती 5,00,000/–रू. असा एकुण कि. 5,04,000/–रू. रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार अमोल कुथे स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अशोक कोळी मो.क्र. 8080872474 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 7 कि मी अंतरावरील इंस्टाग्राम (ऑनलाईन) मनसर येथे दिनांक 13/12/2021 ते दिनांक 24/12/2021 चे 10.00 वा. ते 12.00 वा. दरम्यान वय 17 वर्षीय फिर्यादी हिला तिचे इंस्टाग्राम आय.डी. वरती अज्ञात आरोपीने त्याचे इंस्टाग्राम आय.डी वरुन फिर्यादीचे इंस्टाग्राम आय.डी. वरील फोटोज प्राप्त करुन फिर्यादीची बदनामी करण्याचे उद्देशाने फिर्यादीचे फोटो वरती अश्लिल लेख लिहुन सोशल मिडीया व स्वतःचे इंस्टाग्राम आय.डी. वरती प्रसारीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 500 भादंवि. सहकलम 67(अ) माहिति अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मकेश्वर मो.क्र. 9049965014 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर